महाराष्ट्र शासन
अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभाग
शासन आदेश क्रमांक : आस्थाप्र-२२१९/प्र.क्र.१६८/ना.पु.१५.
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरू चौक,
मंत्रालय, मुंबई -४०० ०३२.
दिनांक : ३० ऑगस्ट, २०१९

वाचा :- अन्न,नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभागाचा शासन आदेश क्रमांक : आस्थाप्र-२२१९ / प्र.क्र.१६८/ ना.पु.१५,दि.०४/०६/२०१९.

प्रस्तावना :-

महाराष्ट्र शासकीय कर्मचाऱ्यांच्या बदल्यांचे विनियमन आणि शासकीय कर्तव्ये पार पडताना होणाऱ्या विलंबास प्रतिबंध अधिनियम, २००५ च्या कलम ४ (१), ४ (२) व ४ (३) अनुसार श्री. रमेश आडे, उपायुक्त (पुरवठा), नागपूर व श्री. रमेश मावसकर, उपायुक्त (पुरवठा), अमरावती यांची अनुक्रमे उपायुक्त (पुरवठा), कोकण आणि उपायुक्त (पुरवठा), नागपूर येथे नियतकालिक बदली करण्यात आली होती. सदर बदली आदेशामध्ये बदल करण्याची बाब विचाराधीन होती.

शासन आदेश

उपरोक्त संदर्भाधीन आदेश या आदेशान्वये रद्द करण्यात येत आहे. श्री. रमेश आडे, उपायुक्त (पुरवठा) व श्री. रमेश मावसकर, उपायुक्त (पुरवठा) यांना त्यांच्या सध्याच्या कार्यरत ठिकाणी एक वर्षाकरिता मुदतवाढ देण्यात येत आहे.

अ.क्र.	उपायुक्त (पुरवठा) यांचे नाव	सध्या कार्यरत ठिकाण
१	श्री. रमेश आडे	उपायुक्त (पुरवठा), नागपूर
२	श्री. रमेश मावसकर	उपायुक्त (पुरवठा), अमरावती

२. सदर शासन आदेश महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेतांक २०१९०८३०१२२८३६७९०६ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करून काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

Asmita Gopal Jagtap

Digitally signed by Asmita Gopal Jagtap
DN: c=IN, o=Government of Maharashtra, ou=Food Civil Supply And Consumer Protection Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=86c1e7844a91135f45e721934111ca2b5dc8481b51e96a79000aeea1e91208fb, serialNumber=8e2cf7f99a7e33f6152bff0b34255dd63550b37c8fbbb9a98cee4ecd4336f598, cn=Asmita Gopal Jagtap
Date: 2019.08.30 12:40:51 +05'30'

(अस्मिता जगताप)
कक्ष अधिकारी, महाराष्ट्र शासन

प्रति,

१) श्री. रमेश आडे, उपायुक्त (पुरवठा), नागपूर.
२) श्री. रमेश मावसकर, उपायुक्त (पुरवठा), अमरावती.

प्रत:-

१) विभागीय आयुक्त, नागपूर/ अमरावती.
२) महालेखापाल-१ व २ (लेखा व अनुज्ञेयता / लेखा परीक्षा), मुंबई व नागपूर.
३) लेखा व अधिदान अधिकारी, मुंबई.
४) खाजगी सचिव, मा. मंत्री (अनापु व ग्रासंवि) यांचे कार्यालय.
५) खाजगी सचिव, मा. राज्यमंत्री (अनापु व ग्रासंवि) यांचे कार्यालय.
६) मा. प्रधान सचिव, अन्न,नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभाग, मंत्रालय यांचे स्वीय्य सहाय्यक.
७) जिल्हा कोषागार अधिकारी, नागपूर/ अमरावती.
८) निवडनस्ती/नापु-१५.